ePaper

“आलं तर आलं तुफान”, अजितदादांच्या बंडखोरीनंतर सुप्रिया सुळेंचं भाष्य



| वर्ष - 7 । अंक -68 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- विश्रांतवाडीत "मान्सून शॉपिंग फेस्टिवल"
- शरद पवारांच्या निवासस्थानाबाहेर गर्दी
- ‘सीएमई’ हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला संरक्षण विभागाचा ‘हिरवा कंदील’!

www.mahaenews.com । शनिवार, दिनांक 8 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरीत भाजपाच ‘सव्वाशेर’ पण..!

## नव्या राजकीय समीकरणावर मंथन बैठक : मोदींचे हात बळकट करण्यासाठी एकजूट

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यात झालेल्या राजकीय भूकंपाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष पिंपरी विधानसभा सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांची मंथन बैठक भाजपा शहर कार्यालय मोरवाडी येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी बदलल्या राजकीय समीकरणाचा भाजपा संघटनावर काय परिणाम होत आहे, कार्यकर्त्यांचा काय समस्या आहेत? हे जाणून घेण्यासाठी शहराध्यक्ष आमदार महेश लांडगे, निवडणूक प्रमुख अमित गोरखे व विधानसभा प्रमुख कार्यकर्त यांच्या उपस्थितीत ही बैठक संपन्न झाली.



### भाजपाच क्रमांक एकचा पक्ष राहील : आ. महेश लांडगे



राजकीय समीकरण जरी बदलले असले तरी भाजपा पक्ष हा अधिक सक्षमपणे पुढील वाटचाल करेल, सर्व कार्यकर्ते पदाधिकारी यांनी झालेला बदल स्विकारून आपल्या पक्ष संघटनेस अधिक मजबूत केले पाहिजे. येणाऱ्या सर्व निवडणुकीत भाजपा हाच एक क्रमांकचा पक्ष असेल हा निर्धार करून आपण सर्वांनी अधिक जोमाने कामाला लागले पाहिजे. भोसरी विधानसभा अथवा शिरूर लोकसभेची जरी जबाबदारी माझ्यावर असली तरी पिंपरी विधानसभेतील सर्व कार्यकर्ते यांच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही आहोत, अशी ग्वाही शहराध्यक्ष आमदार महेश लांडगे यांनी दिली.

बदललेल्या राजकीय समीकरण नंतर कार्यकर्ते यांच्या भावना समजून घेण्यासाठी मंथन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पिंपरीत भाजपा कार्यकर्ता संघटन अधिक मजबूत करण्यासाठी व पुन्हा नरेंद्र मोदी यांना देशाचे पंतप्रधान करण्यासाठी आम्ही सर्व एकत्रित येऊन काम करणार आहोत. भाजपा कार्यकर्ते यांच्या भावनांची नोंद घेऊन आपल्या समस्या वरिष्ठ नेते यांच्यापर्यंत पोहचवल्या जातील, अशी माहिती पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांनी सांगितले.

काही निर्णय व त्याचे परिणाम समजून येण्यासाठी वेळ लागतो, त्यामुळे आपण सर्वांनी सकारात्मक भूमिका घेऊन पुढील काळात वाटचाल केली पाहिजे, असा सल्ला प्रदेश सदस्य सदाशिव खाडे यांनी दिला. यावेळी युवा मोर्चा उपाध्यक्ष अनुप मोरे, सरचिटणीस राजू दुर्गे, नगरसेवक शीतल शिंदे, माउली थोरात, केशव घोळवे, अनुराधा गोरखे, सुजाता पालंडे, शैलेश मोरे, आर एस कुमार, प्रकाश जवळकर, विशाल वाळूंजकर इतरांनी आपली मनोगतं व्यक्त केली. मंडल अध्यक्ष विजय शिनकर, महेंद्र बाविस्कर, शर्मिला बाबर, कोमल शिंदे, कमलेश भारवाल, रेखा कडाली, संजय मोगाडेकर, कैलास कुटे, गणेश लंगोटे व मोठ्या संखेने कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# महिला सक्षमीकरणासाठी ‘कल्याणकारी योजना’

## अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील : अधिकाधिक महिलांनी लाभ घ्यावा!

। पिंपरी । महाईन्यूज

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या नियंत्रणाखाली महिला व बालकल्याण योजना राबविण्यात येत आहेत. याचा लाभ लाभार्थीनी घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

मर्यादित कालावधीकरीता असणाऱ्या योजनेमध्ये इयत्ता ८ वी ते १० वी मधील विद्यार्थीनींना सायकल घेण्यासाठी ७ हजार रुपये अर्थसहाय्य, सामाजिक संस्थांना सावित्रीबाई फुले पुरस्कारासाठी २५ हजार रुपये, सन्मानपत्र आणि स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे.

लोकनायक गोपीनाथ मुंडे १२ वी नंतरचे प्रथम वर्ष वैद्यकीय योजनेंतर्गत (एम .बी. बी. एस/ बी. ए. एम. एस / बी. एच. एम. एस / बी. डी. एस / बी.





यु. एम. एस) बी.आर्किटेक्चर / बी. पी. टी. एच / बी. फार्म / बी. व्ही. एस. सी आणि अभियांत्रिकी पदवी परीक्षा यांसारखे उच्च शिक्षण घेण्यासाठी २५ हजार रुपये तर रामभाऊ म्हाळगी योजनेंतर्गत मुलींना तांत्रिक प्रशिक्षण किंवा अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी आय. टी. आय विद्यार्थ्यांना ३ हजार रुपये आणि अभियांत्रिकी पदविका विद्यार्थ्यांना ७ हजार ५०० रुपये तसेच महाराष्ट्र राज्य मंडळ (एस.एस.सी बोर्ड ) अंतर्गत शाळांमधील इयत्ता १० वी मधील मुलींना शैक्षणिक साहित्य घेणेकामी ६ हजार रुपये अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

### बेटी बचाव बेटी पढाओ...

बेटी बचाव बेटी पढाओ योजनेंतर्गत पहिल्या मुलीवर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या महिलेस २५ हजार रुपये मुदत ठेव स्वरूपात देण्यात येणार आहे. मदर तेरेसा योजनेंतर्गत नोंदणीकृत महिला संस्थांना / महापालिकेकडील नोंदणीकृत अनुदान प्राप्त महिला बचतगटांना पाळणाघर सुरू करण्याकरिता प्रारंभिक मुलभूत खर्चासाठी १० हजार रुपये आणि त्यानंतर इतर खर्चासाठी दर सहामाहीस १२ हजार रुपये अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

# पुणे तेथे काय उणे!

## » महावितरणाच्या तिजोरीत दरमहा कोटींची भर

## » गेल्या 3 वर्षांमध्ये ऑनलाइन वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत 35 टक्क्यांची भर

### » पुणेकर ठरले अव्वल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणेकर 'ई-भरणा'त अव्वल ठरले आहेत. यामुळे महावितरणाच्या तिजोरीत दरमहा कोटींची पडते भर पडते. गेल्या तीन वर्षांमध्ये ऑनलाइन वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत ३५ टक्क्यांची भर पडली आहे.'महावितरण'चे दरमहा सरासरी एक कोटी दहा लाख वीजग्राहक (६५ टक्के) पाच हजार ७५० कोटी रुपयांच्या वीजबिलांचा घरबसल्या आणि सुरक्षित भरणा करीत आहेत. त्यामध्ये पुणे परिमंडलातील २२ लाख ८३ हजार ग्राहकांनी सर्वाधिक १२०२ कोटी ७६ लाख रुपयांचा वीजबिलांचा भरणा करून राज्यात आघाडी घेतली आहे. गेल्या तीन वर्षांमध्ये ऑनलाइन वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत ३५ टक्क्यांची भर पडली आहे.**




बिलभरणा केंद्राच्या रांगेत उभे राहण्याऐवजी किंवा कार्यालयीन वेळेत वीजबिल भरण्याऐवजी ऑनलाइनद्वारे चोवीस तासांत कधीही वीजबिल भरण्याची सोय 'महावितरण'ने उपलब्ध करून दिली आहे.

- 'महावितरण'चे संकेतस्थळ किंवा मोबाइल ॲपवरून एकापेक्षा अधिक वीजजोडण्यांची बिले ऑनलाइन भरता येतात.
- याद्वारे बिलांचा तपशील आणि रक्कम भरल्याची पावती कम्प्युटर आणि मोबाइलमध्ये जतन करून ठेवता येते.
- त्याचा फायदा घेऊन 'महावितरण'च्या उच्च दाब वर्गवारीतील सर्व ग्राहक दरमहा वीजबिले ऑनलाइन माध्यमातून भरत आहेत.

बारामती परिमंडळातील १० लाख ६८ हजार ग्राहकांनी ५१९.३५ कोटी रुपये आणि नाशिक परिमंडलातील १० लाख ५३ हजार ग्राहकांनी ४६९.६४ कोटी रुपयांच्या वीजबिलांचा ऑनलाइन भरणा केला आहे.

### 'ई-बिलां'मध्ये पुणे अव्वल

»'महावितरण'च्या उच्चदाब आणि लघुदाब मिळून एक कोटी १० लाख ग्राहकांनी पाच हजार ७५० कोटी रुपयांचा ऑनलाइन भरणा केला आहे. त्यामध्ये पुणे परिमंडळातील वीजग्राहक आघाडीवर असून, त्यापाठोपाठ कल्याण परिमंडलातील १९ लाख ७ हजार ग्राहकांनी ७२५.७९ कोटी रुपये आणि भांडूप परिमंडलातील १७ लाख ३१ हजार ग्राहकांनी १००५ कोटी ४१ लाख रुपयांच्या बिलांचा ऑनलाइन भरणा केला आहे.

### ऑनलाइन वीजबिलांत सवलत

'ऑनलाइन' वीजबिल भरल्यास दरमहा ५०० रुपयांच्या मर्यादित दरमहा वीजबिलामध्ये ०.२५ टक्के आणि वीजबिलाचा तातडीने भरणा केल्यास एक टक्का अशी एकूण १.२५ टक्के सवलत ग्राहकांना देण्यात येते. विशेष म्हणजे क्रेडिट कार्ड वगळता उर्वरित सर्व पर्यायाद्वारे 'ऑनलाइन'द्वारे होणारा वीजबिलाचा भरणा नि:शुल्क आहे. लघुदाब ग्राहकांसाठी घरबसल्या 'एका क्लिक'वर वीजबिल भरण्याची सुरक्षित आणि ऑनलाइन सेवा उपलब्ध आहे. त्यामुळे जास्तीत जास्त ग्राहकांनी वीजबिले ऑनलाइन माध्यमातून भरावीत, असे आवाहन 'महावितरण'ने केले आहे.

# येरवडा कारागृहात परत तेच; ३ महिन्यांत १० मोबाइल जप्त!

## » कारागृहाच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नियमांचे काटेकोर पालन केले जाणाऱ्या येरवडा मध्यवर्ती कारागृहाची सुरक्षाव्यवस्था भेदून कैद्यांसाठी दहा मोबाइल आतमध्ये नेण्यात आल्याचे समोर आले आहे. तीन महिन्यांत कैद्यांकडे दहा मोबाइल सापडले आहेत. त्यामुळे कारागृहाच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**



येरवडा कारागृहात एप्रिल ते सहा जुलै २०२३ या कालावधीत मोबाइल दहा मोबाइल, सीम कार्ड, चार्जर, मोबाइलच्या अतिरिक्त बॅटऱ्या सापडल्या आहेत. एप्रिल महिन्यातच कारागृह प्रशासनाने ड्रोनद्वारे कारागृह आणि कैद्यांवर देखरेख ठेवण्यास सुरुवात केली आहे. तसेच, कैद्यांना कुटुंबीयांशी संवाद साधण्यासाठी सुलभ प्रक्रिया उपलब्ध करून दिली आहे. त्यानंतरही बेकायदेशीर पद्धतीने मोबाइलचा वापर थांबलेला नाही. कारागृहात बराकीच्या बाथरूममध्ये, माडी गेट आणि अंतर्गत भिंतीत मोबाइल लपवून ठेवण्याच्या जागा कैद्यांनी शोधल्या आहेत. कारागृहात मोबाइलचा वापर रोखण्यासाठी कारागृह प्रशासनाकडून विविध उपाययोजना राबविल्या जात असतानाही कारागृहात आतमध्ये मोबाइल जात असल्याने ही गंभीर बाब मानली जात आहे.

### चार्जर आणि बॅटऱ्या

येरवडा कारागृहात बुधवारी सायंकाळी पुन्हा एकदा कैद्यांकडे दोन मोबाईल, दोन बॅटऱ्या, चार्जर आणि एक सिमकार्ड सापडले. महेश माने, अजय कांबळे, अनिकेत चौधरी आणि नरेश दळवी या न्यायाधीन (कच्चे) कैद्यांवर येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येरवडा कारागृहात सर्कल एकमधील बराक चारमध्ये काही कैदी मोबाइल वापरत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कैद्यांची झडती घेतली. त्या वेळी माने आणि कांबळे यांच्याकडून मोबाइल जप्त केले. तर, चौधरीकडून मोबाइलचा चार्जर आणि दळवीकडे सिमकार्ड सापडले.

# पार्थच्या रिलॉंचिंगसाठी अजित पवारांचा मावळवर डोळा!

## » श्रीरंग बारणे यांचा उमेदवारीवर दावा

। पुणे । महाईन्यूज ।

२०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाचे नेते अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांना मावळ मधून खासदारकीची उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, त्यात त्यांना अपयश आले. मात्र अजित पवार यांनी राष्ट्रवादीतून बंड करत शिंदे - भाजप सरकारमध्ये सामील होत उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यामुळे शिंदे गटाच्या शिवसेनेत कमालीची अस्वस्थता पसरली आहे. त्यातच मावळचे आमदार श्रीरंग बारणे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवर पुन्हा एकदा दावा केला आहे. मात्र, याचवेळी पार्थ पवार यांना अजित पवार हे मावळमधून उमेदवारी देणार असल्याचे चर्चांना उधाण आले आहे. महायुतीत अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस सहभागी झाली. त्यानंतर २०२४ ची मावळ लोकसभा निवडणुक मुख्यमंत्री शिंदे गटाचे



खासदार श्रीरंग बारणे की उपमुख्यमंत्री अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार लढणार? याबाबत चर्चा मतदारसंघात रंगली आहे.

२०१९ साली पार्थ पवारांना ज्यांच्यामुळं पराभव चाखावा लागला, त्या श्रीरंग बारणेंनी राष्ट्रवादी आमच्या महायुतीत असली तरी २०२४ लोकसभा निवडणुकीत मीच उमेदवार असणार,असं म्हणत आत्ताच दावा ठोकला आहे. त्यामुळं पार्थ पवारांचं काय होणार? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. शिंदे - फडणवीस सरकारमधील मावळ लोकसभेचा उमेदवार मीच असा दावाच श्रीरंग बारणे यांनी केला आहे. शिंदे आणि फडणवीस यांच्यासोबत चर्चा झाली असून त्याच्यामध्ये कोणातही बदल होईल असे वाटत नसून आपणच मावळ लोकसभेचा उमेदवार असल्याचा दावा बारणे यांनी केला आहे.

पार्थ पवार यांना अजित पवार निवडणुकीसाठी कुठून उमेदवारी देतात हे अद्याप जरी स्पष्ट झाले नसले तरी मावळ लोकसभेची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.

# पोलीस आयुक्त 'ऑन फायर मोड'!

## » तीन टोळ्यांना 'मोका' : सहा महिन्यांत 168 जणांवर कारवाई

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी शहरातील गुन्हेगारांच्या नाड्या आवळण्यास सुरुवात केली आहे. संघटितपणे गुन्हे करणाऱ्या तीन टोळ्यांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन 1999 (मोका) अंतर्गत कारवाई केली आहे. जानेवारी ते जुलै या कालावधीत तब्बल 14 टोळ्यातील 168 आरोपींवर ही कारवाई करण्यात आली आहे.**




वर्चस्ववादातून सोन्या तापकीर या तरुणाची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. या हत्येत सहभागी असलेल्या टोळी प्रमुख करण रोकडे (वय 25, रा. चिंतामणीनगर, चिखली) आणि त्याच्या 12 साथीदारांच्या विरोधात मोकाची कारवाई करण्यात आली आहे. या टोळीतील आरोपींच्या विरोधात खून, खुनाचा कट रचणे, खूनाचा प्रयत्न, दरोडा, दरोड्याची तयारी करणे, बेकायदेशीर जमाव जमवून खूनाचा प्रयत्न, दुखापत, विनयभंग, जबरी चोरी, बेकायदेशीरपणे अग्निशम जवळ बाळगणे, असे एकूण 24 गुन्हे दाखल आहेत.

टोळी प्रमुख करण रोकडे, सौरभ उर्फ सोन्या बाळासाहेब पानसरे (वय 23, रा. मोईगाव, ता. खेड), चेतन राजू कणसे (वय 27, रा. चिखली), सचिन दीपक लोखंडे (वय 27, रा. चिखली), सचिन नितीन गायकवाड (वय 23, रा. चिखली गावठाण), मुंग्या उर्फ हृतिक रतन रोकडे (रा. चिखली), रिंकू दिनेश कुमार (वय 18, रा. चिखली), प्रीतम प्रताप सोनोने (वय 31, रा. चिखली), ऋतिक सुभाष जाधव (वय 24, रा. देहूगाव), कपिल लोखंडे, एक महिला आणि दोन अल्पवयीन मुले यांच्यावर कारवाई झाली आहे.

तळेगाव एमआयडीसीतील टोळी प्रमुख अनिल जगन जाधव (वय 23, रा. वराळे, ता. मावळ) यांच्यासह सहा जणांच्या विरोधात मोकाची कारवाई केली आहे. या टोळीवर खुनाचा प्रयत्न, खंडणी मागणे, दरोडा घालणे व बेकायदेशीरपणे अग्निशस्त्रे जवळ बाळगणे, असे एकुण सहा गुन्हे दाखल आहेत.

टोळी प्रमुख अनिल जाधव, सदस्य संजय ज्ञानेश्वर माळवदकर (वय 24, रा. वराळे), कुमार सुरेश मोहिते (वय 20, रा. वडगाव मावळ), हर्ष उर्फ सोन्या प्रमोद साठे (वय 19, रा. वराळे, ता. मावळ), विकास उर्फ बापू विष्णू रिटे (वय 28, रा. वडगाव मावळ), दोन अल्पवयीन मुले या टोळीवर कारवाई झाली आहे.

### सांगवीत बाबा शेख टोळीचा बंदोबस्त...

» सांगवीतील टोळी प्रमुख बाबा सैफन शेख,(वय 29, राजीव गांधीनगर, पिंपळे गुरव) त्याच्या टोळीतील इतर आठ जणांच्या विरोधात मोकाची कारवाई करण्यात आली आहे. या टोळीवर जबर दुखापत करून दरोडा, गंभीर दुखापत, दुखापत, खूनाचा प्रयत्न, जबरी चोरी, बेकायदेशीर जमाव जमवुन गंभीर दुखापत, गाडयांची तोडफोड करुन नुकसान करणे व बेकायदेशीररित्या घातक शस्त्र जवळ बाळगणे असे एकुण 10 गुन्हे दाखल आहेत. टोळी प्रमुख बाबा शेख, साथीदार रामा हनुमंत कांबळे (वय 25 , रा. बाणेर), अक्षय मारुती अहिवळे (वय 21, रा. औंध), गफूर हुसेन शेख (वय 21, रा. औंध), अनिल सिद्धू आणुरकर (वय 19, रा. बाणेर), आकाश संजय क्षीरसागर (वय 20, रा. पिंपळे गुरव) या टोळीवर कारवाई झाली आहे.

### वर्चस्वासाठी हिंसाचाराचा वापर करणाऱ्यांना लगाम...

» या तीनही टोळतील आरोपींनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवून हिंसाचाराचा वर्चस्वासाठी व आर्थिक फायद्यासाठी वापर केला. यामुळे त्यांच्यावर पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी मोकाची कारवाई केली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह आयुक्त डॉ. संजय शिंदे, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त स्वप्ना गोरे, काकासाहेब डोळे, सहायक आयुक्त बाळासाहेब कोपनर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर अवताडे, ज्ञानेश्वर काटकर, सुनिल टोणपे, रणजित सावंत, पोलीस हवालदार सचिन चव्हाण, व्यंकप्पा कारभारी, दुर्गा खाडे, सुहास डंगारे, सचिन नांगरे यांच्या पथकाने केली आहे.

# 'होर्डिंग पॉलिसी' बाबत प्रशासनाची सतर्कता!

## » बेकायदा होर्डिंग हटवणार : उपायुक्त सुभाष इंगळे यांची माहिती

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**किवळे येथे अनधिकृत होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर शहरातील होर्डिंगचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारची दुर्घटना होऊ नये म्हणून शहरातील सर्व होर्डिंगधारकांना स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले होते. त्यानुसार अधिकृत फलक असलेल्या १ हजार १३५ व न्यायालयीन वादातील २८१ अशा १ हजार ४१६ होर्डिंगधारकांनी स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी प्रमाणपत्र सादर केले आहे. तसेच यापुढे नियमानुसार होर्डिंग नसलेल्या होर्डिंगचालकांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा आकाश चिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त सुभाष इंगळे यांनी दिला आहे.**



किवळे येथे (दि. १७) एप्रिल रोजी अनधिकृत होर्डिंग पडून पाच जणांचा मृत्यू झाला तर तिघे जखमी झाले आहेत. या घटनेनंतर अनधिकृत जाहिरात फलक व अधिकृत फलकांच्या स्ट्रक्चरल ऑडिट, राज्य सरकारचे जाहिरात धोरणाची अंमलबजावणी करण्यासह अनधिकृत होर्डिंग काढून घेण्यासाठी आयुक्त सिंह यांनी कठोर पाऊले उचलली आहेत. शहरात न्यायालयात प्रलंबित असलेल्या ४३३ होर्डिंग व्यतिरिक्त ९१ नव्याने अनधिकृत होर्डिंग आढळून आले होते. हे सर्व होर्डिंग जमीनदोस्त करण्यात आले आहेत.

महापालिकेच्या आकाश चिन्ह व परवाना विभागाने शहरातील सर्व होर्डिंगधारकांना नव्याने अर्ज करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार अधिकृत असलेले ८०७, न्यायालयीन प्रकरणातील १८४ जणांनी नूतनीकरणासाठी तर नवीन होर्डिंगसाठी ५४ अशा १ हजार ४५ जणांनी अर्ज केले आहेत. होर्डिंग उभारण्यासाठी व्यावसायिकांनी अर्ज केले असली तरी नियमानुसारच होर्डिंग उभारण्यास परवानगी देण्यात येणार असल्याचे आकाश चिन्ह व परवाना विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

> न्यायालयात असलेल्या २५७ होर्डिंगधारकांनी परवाना शुल्क म्हणून ३ कोटी ९७ लाख रुपयांचा भरणा केला आहे. यापुढील काळात होर्डिंग संदर्भात राज्य शासनाने ठरवून दिलेल्या ९ मे २०२२ च्या धोरणाची शहरात काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाणार आहे. विभागाच्या मार्फत शहरातील प्रत्येक होर्डिंगची पाहणी करण्यात येणार आहे. तसेच शासनाच्या धोरणानुसार नसलेल्या होर्डिंगवर कारवाई करण्यात येणार आहे.
>
> **- सुभाष इंगळे,**
> उपायुक्त, आकाश चिन्ह व परवाना विभाग

### होर्डिंगबाबतची नियमावली...

- » होर्डिंगची उंची जास्तीत जास्त ४० फूट पाहिजे
- » आकाशचिन्ह विभागाकडून सर्व मंजुऱ्या आवश्यक
- » स्ट्रक्चर स्टॅबिलिटी पाहिजे
- » धोकादायक होर्डिंग उभारल्यास तातडीने कारवाई
- » अनधिकृत होर्डिंगवर दंड आकारणी

# मुंबई-गोवा महामार्गाच्या परवडीची मुंबई उच्च न्यायालयाकडून गंभीर दखल




**सत्तेच्या दिशेने जाणारा मार्ग शोधण्यात सगळेच पक्ष आणि सगळेच नेते आपले राजकीय कौशल्य, निष्ठा, विचारधारा पणाला लावत असताना मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई-गोवा महामार्गाच्या परवडीची गंभीर दखल घेतली आहे. न्यायालयात दिलेल्या हमीचे पालन केले नाही म्हणून सार्वजनिक बांधकाम खाते आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना ५० हजारांचा दंड ठोठावला आहे.**

दंडाची रक्कम महत्त्वाची नसून ही कारवाई महत्त्वाची आहे. एन. एच. ६६ या क्रमांकाचा टिळा लावलेल्या या राष्ट्रीय महामार्गाला प्रथम सन २०१० साली चौपदरीकरणाचे स्वप्न दाखवले गेले. त्याच्या क्रमांकाच्या आकड्यांच्या बेरजेएवढी वर्षे होऊनही ते स्वप्न अद्याप स्वप्नच राहिले आहे. या संपूर्ण महामार्गासाठी भूसंपादन वगळून ९६० कोटींच्या प्रारंभिक खर्चाचा अंदाज होता, तो फुगून दीड हजार कोटींच्या वर गेला आहे. मात्र, गेले एक तप असंख्य लहान-मोठे खड्डे आपल्या अंगाखांद्यावर खेळवत हा महामार्ग आपले रूंदीकरण कधी पूर्ण होते याची वाट पाहात अश्रू ढाळत बसला आहे. या काळात कितिकांच्या खिशांचे रूंदीकरण झाले असेल, ते त्या खड्ड्यांनाच ठाऊक. या १२ वर्षांच्या काळात राज्यात अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि आता एकनाथ शिंदे असे पाच मुख्यमंत्री झाले. औट घटकेचा शपथविधी धरला तर सहा. पैकी छगन भुजबळ हे दोन्ही चव्हाणांच्या कार्यकाळात सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. भुजबळांनी हट्टाने या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम केंद्राकडून राज्याकडे घेतले होते, असे सांगितले



जाते. न्यायालयाने कठोर भूमिका घेतलेली असताना भुजबळ पुन्हा एकदा मंत्री झाले आहेत. याहीवेळी त्यांचे आवडते सार्वजनिक बांधकाम खाते त्यांच्याकडे आले तर किमान १२ वर्षांनी तरी ते आपला संकल्प तडीस नेतील, अशी अपेक्षा करता येईल. मात्र, दरम्यान या राष्ट्रीय महामार्गाने विविध अपघातांमध्ये अडीच हजारांहून अधिक बळी घेतले आहेत. त्यामुळे अनेक वाहनचालक या मार्गाने जाण्याचे टाळतात. काही मुंबई, कोल्हापूर, आंबोली घाट, सावंतवाडी, गोवा असा मार्ग निवडतात तर काही मुंबई, कोल्हापूर, बेळगावी, गोवा या मार्गाने जातात. या दोन्ही मार्गांनी जाताना 'गोवा अभी दूर है'चा प्रत्यय येतो, परंतु कमरेची हाडे खिळखिळी करून घेण्यापेक्षा वेळ आणि पेट्रोल खर्च झाले तरी बेहत्तर, असा पवित्रा नाईलाजाने घ्यावा लागतो.

८४ किलोमीटर लांबीचा पनवेल-इंदापूर हा नियोजित रुंदीकरणाचा पहिला टप्पा होता. मात्र, हा मार्गसुद्धा अद्याप 'मार्गी' लागलेला नाही. वनजमीन मंजुरी, भूसंपादन अशा विविध समस्यांमुळे या रुंदीकरणाला विलंब होत आहे. मार्ग पूर्ण होण्याची मात्र सतत पुढची तारीख दिली जाते. सरकारला जर एखाद्या मार्गाचे काम पूर्ण करायचे असेल तर अडथळ दूर करणे अशक्य नसते, हे समृद्धी महामार्गाबाबत आपण अनुभवले आहे. मुंबई-गोवा महामार्गाची जबाबदारी केंद्र आणि राज्य अशी विभागलेली आहे; त्यामुळे 'दोन्ही घरचा पाहुणा उपाशी राहून' काम पुढे जात नाही, असा एक देखावा निर्माण केला जातो. प्रत्यक्षात ११ टप्प्यांपैकी १० टप्प्यांची जबाबदारी राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे आणि केवळ पनवेल ते इंदापूर या ८४ किलोमीटरची जबाबदारी केंद्राकडे आहे. या वेगवेगळ्या टप्प्यांवरील कंत्राटे देण्याच्या राजकारणात आणि त्यामागील अर्थकारणात या विलंबाचे खरे कारण दडले असावे. निष्क्रिय प्रशासन, मुजोर कंत्राटदार यासोबतच दबाव निर्माण करण्यात अपयशी ठरलेले लोकप्रतिनिधी यांना कोकणवासी यासाठी जबाबदार धरतात. परंतु स्थानिक लोकप्रतिनिधी याबाबत सावधपणे बोलतात आणि मग रूंदीकरण प्रतिक्षेचे 'लांबीकरण' होते.

कामाचा निकृष्ट दर्जा, गैरसोयी, दुर्लक्ष आणि अत्यंत बेपर्वा वृत्ती अशा विविध गोष्टी त्यातून पुढे आल्या होत्या. काही भागात आधी डांबरीकरण केले गेले आणि मग कोकणातील पावसाचा जोर पाहता तिथे डांबरी रस्ते टिकाव धरत नाहीत, कॉंक्रिटचे रस्ते केले पाहिजेत, असा निष्कर्ष काढला गेला. मुळात हा अभ्यास आधी होणे गरजेचे होते. 'एका कंत्राटदाराची धन करून झाल्यानंतर हे शहाणपण येण्यात काय अर्थ,' असा प्रश्न विचारता येत नाही, कारण त्यात 'अर्थ' असतोच. 'या महामार्गाची प्रगती आणि खड्ड्यांची अवस्था यावरही देखरेख ठेवू' असे न्यायालयाने म्हटले असले तरी सरकार मनावर घेत नाही, तोवर हे काम पूर्ण होणे शक्य नाही. सत्यजित रे यांच्या 'पथेर पांचाली' या शीर्षकाचा अर्थ होतो 'रस्त्याचे गाणे.' मुंबई-गोवा महामार्गाच्या परवडीचा इतिहास सांगायचा तर त्याला 'रस्त्याचे रडगाणे' असे शीर्षक द्यावे लागेल.

## संपादकीय »

### पवारांचे पंचनामे!

***न वाढणारी सुपीक जमीन आणि त्याचवेळी वाढती कुटुंबे; हा त्यातला कळीचा संघर्ष असतो. याशिवाय, पुत्रांचे अंधप्रेम आणि त्यांच्यावर निकोप वंशवृद्धीची जबाबदारी हे पुरुषसत्ताक समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे.***

महाराष्ट्राला ऐतिहासिक काळापासूनच काका-पुतण्यांची जोडी काही लाभी दिसत नाही. अर्थात, पुतण्यांचा अधिकार मान्य करायचा नाही आणि त्यांना झगडायला लावायचे, हे कृषी संस्कृतीत हजारो वर्षे होत आले आहे. न वाढणारी सुपीक जमीन आणि त्याचवेळी वाढती कुटुंबे; हा त्यातला कळीचा संघर्ष असतो. याशिवाय, पुत्रांचे अंधप्रेम आणि त्यांच्यावर निकोप वंशवृद्धीची जबाबदारी हे पुरुषसत्ताक समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. यामुळेच, ते ओरिजिनल 'महाभारत' घडले. शरद पवार हे पुरोगामी असल्यामुळे त्यांनी पुरुषसत्ताकता सोडून कन्येला उत्तराधिकारी करण्याचा जो चंग बांधला; तो अखेर स्वत:ला 'दबंग' म्हणवून न घेणाऱ्या अजित पवार यांनी ताकदीने उधळून दिला आहे. हे कौटुंबिक संघर्षाचे गळू फुटायला बराच काळ लागला.

**चार दिवसांपूर्वी मध्यप्रदेशातील एक चित्रफीत सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात फिरली,त्यात एक दारुडा अन्य एका असाह्य मुलांच्या तोंडावर लघवी करीत असल्याचे दिसत होते.अतिशय चीड आणणारे आणि तळपायाची आग मस्तकात जाणारे हे दृश्य होते.**

## असे हिंदुराष्ट्र कुणालाही नको...

पोलिसांनी त्याचा तपास लावल्यावर प्रवेश शुक्ला या भाजप कार्यकर्त्यांचे हे प्रताप होते हे लक्षात आले,त्याला अटक करण्यात आली असून खुद्द मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान याना शरमेने मान खाली घालावी लागली. आपल्याच कार्यकर्त्याने हे अमानुष कृत्य केल्याने त्याचे प्रायश्चित्त म्हणून त्यांनी पीडित आदिवासी तरुणाला घरी बोलावून त्याचे पाय धुतले .

मुद्दा असा उपस्थित होतो की आजच्या काळातही कुणाला ,कुणाच्या तोंडावर चक्क मुतण्याचे धाडस कसे होते ? गर्दीतून जाताना आपला कुणाला धक्का लागला तरी आपण त्याच्या पाया पडायला लागतो कारण " कुण्याही जीवाचा न घडो मत्सर.."हा आपला संस्कार असतो. ज्यांच्या डोक्यात वर्ण श्रेष्ठत्व भरले जाते त्यांच्या कडून असे प्रसंग वारंवार घडतात. प्रवेश शुक्ला याला त्याच्या धर्म ग्रंथानी कदाचित हा अधिकार दिला असावा.

देशभरातील अनेक मंदिरात आणि मठात,आश्रमात ब्राह्मण पुजारी,पुरोहित,महा



मंडलेश्वर यांच्या पायांचा आशीर्वाद घेतला जातो, भक्तांच्या अंगावर पाय ठेवून हे भुदेव चालतात ,आजही देशभर देव्हाऱ्यात पादुका (चपला ) पूजल्या जातात यावरून हे लक्षात येते की शूद्रांना असाच आशीर्वाद द्यायचा असतो ....आले का संदर्भ लक्षात ....

गोमूत्र आणि स्वमूत्र ज्यांना सारखेच पवित्र वाटते अश्या वैदिकांनी आजवर हेच केले आहे,आजच्या काळात त्याच्या चित्रफिती व्हायरल होतात एवढाच काय तो फरक आहे,मानसिकता तीच आहे. उद्या आपल्या देशाचे हिंदुराष्ट्र झाले तर त्यात हा धार्मिक विधी असणार नाही याची खात्री कुणी देणार आहे का ?

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# “आलं तर आलं तुफान”

## अजित पवारांच्या बंडखोरीनंतर सुप्रिया सुळेंचं सूचक भाष्य

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्यासह ४० आमदारांनी बंडखोरी केली आहे. यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात सत्तासंघर्षाचा दुसरा अध्याय सुरू झाला आहे. बंडखोरीनंतर अजित पवार गटाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि ‘घड्याळ’ या पक्षचिन्हावर दावा केला आहे. याबाबतचं पत्रही निवडणूक आयोगाला दिलं आहे. अजित पवार हेच राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत, अशा आशयाचं पत्रही निवडणूक आयोगाकडे सादर केलं आहे. यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवार गट आणि अजित पवार गट असे दोन गट पडले आहेत. दोन्ही गट एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत.**



### ट्वीटद्वारे शेअर केले विचार

“आलं तर आलं तुफान”
तुफानाला घाबरुन काय करायचं
तुफानाला तोंड द्यायला शिकलं पाहिजे
तुफानापासून पळून जाणाऱ्या
माणसाच्या हातून काही घडत नाही.
तुफानाला तोंड देण्याची
जी शक्ती आणि इच्छा आहे
त्यातनं तो काहीतरी करू शकतो
आणि घडवू शकतो
अशी माझी धारणा आहे– यशवंतराव चव्हाण (७ मे १९८४, अहमदनगर)

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अप्रत्यक्षपणे अजित पवारांच्या बंडखोरीवर सूचक भाष्य केलं आहे. त्यांनी आपल्या ट्विटर खात्यावरून महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे विचार उद्धृत केले आहेत.याचं शीर्षक ‘आलं तर आलं तुफान’ असं आहे. या कवितेतून सुप्रिया सुळे यांनी सध्याच्या राजकीय स्थितीत एकप्रकारे लढण्याचा इरादा पक्का केल्याचा संदेश दिला आहे. विशेष म्हणजे सुप्रिया सुळे यांनी ५ जुलै रोजी पार पडलेल्या शरद पवार गटाच्या मेळाव्यातही एक कविता सादर केली होती. त्यावेळी सुप्रिया सुळे भाषणात म्हणाल्या होत्या, “१५ वर्षांपूर्वी दासू वैद्य यांनी माझ्यासाठी एक कविता लिहिली होती. तेव्हा मी स्त्रीभ्रूण हत्येच्या विरोधात लढत होते. त्यांनी लिहिलं होतं की, ‘श्रमलेल्या बापासाठी लेक नारळाचं पाणी, लढणाऱ्या लेकीसाठी माझा बाप माझी बुलंद कहाणी’.

---

# ईडीमुळे बंड? पवारांची साथ सोडली?

## कोल्हापुरात येताच मुश्रीफांनी दिली प्रश्नांची उत्तरं

। कोल्हापूर ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्याविरोधात पक्षातील नेते अजित पवार यांच्या नेतृत्वात बंड करून राज्य सरकारमध्ये सहभागी झालेले कॅबिनेट मंत्री हसन मुश्रीफ हे आज शपथविधीनंतर पहिल्यांदाच कोल्हापुरात दाखल झाले. त्यानंतर मुश्रीफ यांनी विरोधकांच्या आरोपांवर पलटवार करत मी विधानसभा निवडणूक लढवणार आणि राज्यात उच्चांकी मताधिक्याने विजयी होणार, असा ठाम विश्वासही व्यक्त केला आहे. हसन मुश्रीफ यांनी त्यांचे कट्टर विरोधक असलेले भाजप जिल्हाध्यक्ष समरजीतसिंह घाटगे यांना जोरदार प्रत्युत्तर दिलं असून मी पवार एके पवार म्हणत होतो आणि अजून देखील तेच म्हणतो. अजित पवार आणि शरद पवार हे काय वेगळे नाहीत, असंही ते यावेळी म्हणाले आहेत.**

स्मार्टफोन क्लिअरन्स स्टोअर, 6299 रुपयांपासून सुरू

राज्य मंत्रिमंडळात समावेश झाल्यानंतर आज पहिल्यांदाच मंत्री हसन मुश्रीफ हे त्यांचा बालेकिल्ला असलेल्या कागल शहरात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या वतीने मुश्रीफ यांचे जंगी स्वागत करण्यात आले. कागल येथील गैबी चौकात मुश्रीफ यांचा आठ वेळा मंत्रिमंडळात समावेश झाल्याने भव्य नागरी सत्कार ठेवण्यात आला होता. यावेळी मोठ्या संख्येने मुश्रीफप्रेमी जमा झाले होते. त्यांनी जनतेशी संवाद साधताना अनेक गोष्टींचा उलगडा केला. 'पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार २०१९ मध्ये अजित पवारांनी पहाटेचा शपथविधी केला. मात्र यावेळी अजित पवारांचा पक्षश्रेष्ठींकडून विश्वासघात करण्यात आला,' असा गौप्यस्फोट मुश्रीफ यांनी केला.

आमदार हसन मुश्रीफ यांच्यावर सुरू असलेल्या ईडीच्या कारवाईमुळे ते भाजपसोबत गेल्याची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. याबाबत देखील त्यांनी भाष्य केले असून मी ईडीच्या धाकामुळे भाजपसोबत गेलो असे काही जण म्हणत आहेत. मात्र गेली आठ महिने आम्ही कसा खंबीरपणे त्यांचा सामना केला, याबाबत मी विधानसभेच्या निवडणुकीत प्रचारामध्ये सांगेन, असे ते म्हणाले असून ईडी तर आता आली आहे.

मात्र आम्ही २०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर भारतीय जनता पक्षाच्या राज्यातील सरकारला पाठिंबा देण्याचा विचार केला होता, असाही दावा मुश्रीफांनी केला आहे. कागलमधील हसन मुश्रीफ यांचे कट्टर विरोधक असलेले कोल्हापूर ग्रामीणचे भाजप जिल्हाध्यक्ष समरजीतसिंह घाटगे हे मुश्रीफांनी युती सरकारमध्ये मंत्रिपदाची शपथ घेतल्याने नाराज झाले होते.



### घाटगे यांच्या टीकेला जोरदार उत्तर

**घाटगे यांच्या टीकेला हसन मुश्रीफ यांनी जोरदार उत्तर दिले असून शरद पवार हे अजूनही आमचे दैवतच आहेत. तुकोबाची पालखी आळंदीमधून आणि अशा वेगवेगळ्या पालख्या वेगवेगळ्या ठिकाणाहून बाहेर पडतात आणि जातात फक्त विठ्ठलाकडेच. याप्रमाणे आमची पालखीसुद्धा शरद पवारांच्या पंढरीकडे जाणार, असे म्हणत मी पवार एके पवार म्हणत होतो आणि शरद पवार आणि अजित पवार एकच आहेत, असं मुश्रीफ म्हणाले.**

---

# भाजपमध्ये कोणीही नाराज नाही!, बावनकुळे यांचा दावा



। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पंतप्रधान नरेंद्र मोदींना साथ देण्यासाठी भाजप बरोबर येणाऱ्यांचे स्वागत करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत आमदारांना केले.

राष्ट्रवादी काँग्रेसला बरोबर घेतल्याने पक्षात निर्माण झालेली नाराजी दूर करण्यासाठी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी पक्षातील आमदार व ज्येष्ठ नेत्यांची शुक्रवारी रात्री बैठक घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदींना साथ देण्यासाठी भाजप बरोबर येणाऱ्यांचे स्वागत करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत आमदारांना केले. तर वरिष्ठांचा निर्णय सर्वांना मान्य असून भाजपमध्ये कोणीही नाराज नसल्याचा दावा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना केला.

मंत्रिमंडळ विस्तार पुढील काही दिवसांत होणार असून सहकारी पक्षांनाही प्रतिनिधित्व द्यावे लागणार असल्याने भाजप नेत्यांनी त्यागाची तयारी ठेवावी, असेही आवाहन यावेळी वरिष्ठ नेत्यांकडून करण्यात आले.

भाजप पक्ष फोडत नाही. पण मोदींना साथ देण्यासाठी जे बरोबर आले, त्यांना घ्यावे लागले. भाजप कार्यकर्त्यांनी पक्ष बळकट करण्यासाठी कामाला लागावे, असे आवाहन फडणवीस यांनी या बैठकीत केले.

# समुद्रकिनारी व्हेलचं पोस्टमार्टम!

## » शास्त्रज्ञाला सुखद धक्का; नशीब फळफळलं, झटक्यात कोट्यधीश

। माद्रिद। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर स्पेनच्या केनरी द्विपकल्पाजवळ शास्त्रज्ञांना तरंगत सोनं सापडलं आहे. त्याची किंमत ४ कोटी ४६ लाख रुपये आहे. एका महाकाय व्हेल माशाचा मृतदेह केनरी द्विपसमूहाजवळ वाहत आला होता. या माशाच्या आतड्यांमध्ये अनमोल खजिना दडला असल्याची कल्पना शास्त्रज्ञांना नव्हती. शास्त्रज्ञांनी व्हेलचं शवविच्छेदन केलं. तेव्हा त्यांना आतड्यांमध्ये उलटी सापडली. व्हेलच्या उलटीला तरंगतं सोनं म्हटलं जातं.**

लाटांचा वेग जास्त असल्यानं शास्त्रज्ञांना शवविच्छेदन करण्यात अडचणी आल्या. व्हेल माशाचा मृत्यू कसा झाला याबद्दल युनिव्हर्सिटी ऑफ लास पाल्मासच्या ऍनिमल हेल्थ अँड फूड सिक्युरिटी इन्स्टिट्यूटचे प्रमुख एंटोनियो फर्नांडिस रॉड्रिग्ज्स यांनी संशोधन केलं. व्हेलच्या पचनतंत्रात समस्या होती, असं त्यांनी सांगितलं. व्हेलच्या मलाशयाची तपासणी करण्यात आली. तेव्हा त्यांना एक कठोर वस्तू सापडली.'मी ती वस्तू बाहेर काढली. ती एका दगडासारखी होती. तिचं वजन साडे नऊ किलो होतं. त्यावेळी समुद्राच्या लाटा वेगानं व्हेलला धडकत होत्या. मी समुद्र किनाऱ्यावरुन परतत होतो, तेव्हा अनेक जण मला पाहतात. पण माझ्या हातात काय होतं याची कोणालाच कल्पना नव्हती. माझ्या हातामध्ये व्हेलची उलटी होती,' असं एंटोनियो फर्नांडिस रॉड्रिग्ज्स यांनी सांगितलं. व्हेलची उलटी अतिशय दुर्मीळ असते. त्यामुळेच तिला तरंगतं सोनं म्हटलं जातं. या उलटीचा वापर अनेक दशकांपासून परफ्युम तयार करण्यासाठी केला जात आहे. व्हेलच्या उलटीला शास्त्रीय भाषेत ऍम्बरग्रीस म्हटलं जातं. तिचा वास अतिशय उग्र असतो.

ऍम्बरग्रीसचा वापर तयार करण्यात आलेल्या परफ्युमचा सुवास दीर्घकाळ टिकतो. अनेक महागडे ब्रँड्स त्यांच्या परफ्युममध्ये ऍम्बरग्रीसचा वापर करतात. अशी परफ्युमसाठी लोक अधिक रक्कम मोजण्यास तयार असतात. त्यामुळेच अनेकदा व्हेल माशांची शिकार केली जाते. व्हेल माशाची उलटी सापडल्यानं कोट्यधीश झालेल्या एंटोनियो फर्नांडिस रॉड्रिग्ज्स यांनी संपूर्ण रक्कम पाल्मा ज्वालामुखीतील पीडितांना दान करण्याचा निर्णय घेतला आहे.



# इंग्रजी कच्चं असल्यास अमेरिकेत सेटल व्हायचं स्वप्न विसरा!

## » नियमात महत्त्वाचे बद; अमेरिकी नागरिकत्व चाचणी अद्ययावत

। सेंट पॉल ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकी नागरिकत्व चाचणी अद्ययावत केली जात असल्याने होऊ घातलेल्या बदलांमुळे इंग्रजी कच्चे असलेल्यांना त्रास होईल, अशी चिंता ही चाचणी देऊ इच्छिणाऱ्या स्थलांतरितांना वाटत आहे. ही चाचणी नागरिकत्व मिळवण्याच्या प्रक्रियेतील अंतिम टप्प्यांपैकी एक आहे. ही महिनाभर चालणारी प्रक्रिया असून अमेरिकेत अनेक वर्षे कायदेशीर कायमस्वरूपी निवास केलेल्या व्यक्तींनाच यासाठी अर्ज करता येतो.**

अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने सन २०२०मध्ये चाचणीचे स्वरूप बदलल्यानंतर अनेकांना धक्का बसला होता. या बदलामुळे ती चाचणी उत्तीर्ण होणे अधिक कठीण झाल्याचे त्यांचे मत होते. त्यानंतर काही महिन्यांतच डेमोक्रॅटिक पक्षाचे जो बायडेन यांनी पदभार स्वीकारला आणि नागरिकत्वाच्या प्रकियेतील अडथळे दूर करण्याच्या उद्देशाने आदेशावर स्वाक्षरी केली. त्यानंतर नागरिकत्व चाचणी पूर्ववत करण्यात आली. सन २००८मध्ये या चाचणीत शेवटचे बदल करण्यात आले होते. ही चाचणी १५ वर्षांनंतर बदलली जाते. त्यानुसार पुढील वर्षाच्या शेवटी नवीन बदल अपेक्षित आहे, असे डिसेंबरमध्ये अमेरिकी अधिकाऱ्यांनी सांगितले होते.

सार्वजनिक अभिप्राय घेऊन यंदा प्रस्तावित बदलांची देशव्यापी चाचणी होईल. त्यानंतर, भाषा संपादन, नागरिकशास्त्र आणि चाचणी विकास या क्षेत्रांतील तज्ज्ञांचा एक बाह्य गट चाचणीच्या निकालांचे पुनरावलोकन करेल आणि प्रस्तावित बदलांची सर्वोत्तम अंमलबजावणी करण्याच्या मार्गांची शिफारस करेल. हे बदल पुढील वर्षाच्या शेवटी लागू होऊ शकतात. दरम्यान, २०२२मध्ये १० लाखांहून अधिक लोकांना अमेरिकी नागरिकत्व मिळाले. १९०७नंतरची ही सर्वोच्च संख्या आहे.



### नेमके काय?

**इंग्रजी कौशल्यांचे मूल्यांकन करण्यासाठीच्या नवीन चाचणीमध्ये इंग्रजी बोलण्याची कौशल्ये तपासणारा विभाग असेल, असे 'यूएस सिटिझनशिप अँड इमिग्रेशन सर्व्हिसेस'ने प्रस्तावित केले आहे. या भागात एक अधिकारी दैनंदिन व्यवहार, हवामान किंवा अन्न यांसारखी छायाचित्रे दाखवून अर्जदाराला त्यांचे तोंडी वर्णन करण्यास सांगेल. सध्याच्या चाचणीमध्ये, एक अधिकारी मुलाखतीदरम्यान वैयक्तिक प्रश्न विचारून बोलण्याच्या क्षमतेचे मूल्यमापन करतो. अर्जदाराने प्रश्नपत्रिकेत या प्रश्नांचे उत्तर आधीच दिलेले असते.**

# मेक्सिकोत भीषण अपघात, बस ८० फूट दरीत कोसळली अन् अनर्थ, २९ जणांच्या मृत्यूनं हळहळ

। ओक्साका । महाईन्यूज

।वृत्तसंस्था ।

मेक्सिकोतील दक्षिणेकडील राज्यातील ओक्साकामध्ये बुधवारी एक बस पर्वतीय भागातून प्रवास करत असताना दरीत कोसळली. या अपघातात जवळपास २९ जणांचा मृत्यू झाला आहे. २१ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. दरीत कोसळल्यानं बस दुर्घटनाग्रस्त झाली होती. अपघाताची माहिती मिळताच एक पथक घटनास्थळी दाखल झालं होतं. या घटनेतील जखमींना उपचारांसाठी विविध रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे. ओक्साकामधील अधिकारी बर्नाडो रॉड्रिग्ज यांनी एएफपी या वृत्तसंस्थेला दिलेल्या माहितीनुसार २९ जणांचा मृत्यू झाला होता. तर, १७ जणांना वैद्यकीय मदत देऊन विविध रुग्णालयांमध्ये पाठवण्यात आलं. आम्ही अपघाताच्या कारणांचा शोध घेत असल्याचं बर्नाडो रॉड्रिग्ज म्हणाले. तांत्रिक बिघाडामुळं अपघात झाला.

### चालकाचं नियंत्रण सुटलं अन्..

नागरी सुरक्षा यंत्रणेनं दिलेल्या माहितीनुसार जखमींना ज्यावेळी रुग्णालयात दाखल करण्यात आलं त्यावेळी ६ लोक बेशुद्ध होते. त्यांची स्थिती गंभीर होती.

तपास अधिकाऱ्यांनी सांगितलं की स्थानिक परिवहन विभागाकडून चालवण्यात यणारी बस मंगळावीर रात्री मेक्सिकोमधून निघाली होती. तर, सैंटियागो डी योसोंडुआ शहराकडे निघाली होती. जीसस रोमेरो या अधिकारी म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीनं बसच्या चालकाचं नियंत्रण सुटल्यानं ही घटना घडल्याचं म्हटलं.

ही बस २५ मीटर खोल दरीत कोसळली आणि २९ जणांचा मृत्यू झाला, असं म्हटलं. जीसस रोमेरो यांनी जखमी प्रवाशांना वेगवेगळ्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती दिली. आपत्कालीन सेवा देणाऱ्या यंत्रणांनी घटनास्थळावरुन मृतदेह ताब्यात घेतले. ही घटना मैग्डालेना पेनास्कोमध्ये घडली.

# 'खूप वर्ष वाट पाहिली शेवटी..', मानसी नाईक

मोठे बोलके डोळे, सुंदर चेहरा आणि उत्तम नृत्यांगना म्हणून ओळख असलेली मानसी नाईक आता एका नव्या भूमिकेत दिसणार आहे. मानसी एका हिंदी वेब फिल्ममध्ये दिसून येणार आहे. फिल्मचं पोस्टर आजच्या खास दिवशी रिलीज करण्यात आलं आहे. पी ए एन्टरटेन्मेंट निर्मीत या फिल्मचं नाव सिफर असं आहे. या फिल्ममध्ये मानसी एका महत्वाच्या भूमिकेत दिसून येणार आहे.या भूमिकेबद्दल मानसी सांगते, "सिफरचा अर्थ शून्य असा आहे, एका अनाथ मुलीचा प्रवास यातून दाखवण्यात आला आहे. याला सिफर का म्हटलं आहे, ते ही फिल्म पाहूनच लक्षात येईल. वाढदिवसाच्या दिवशी या फिल्मची घोषणा करताना मला आनंद होत आहे." फिल्मचं शूटिंग लवकरंच सुरू होणार आहे. या भूमिकेचे खूप टप्पे आहेत मानसीला खूप दिवसांनी अशी भूमिका मिळाली आहे. मानसी या बद्दल म्हणते की, "मला ही भूमिका मिळायला बरीच वर्षे वाट पाहायला लागली. गेली अनेक वर्षे डान्सर म्हणून लोकांनी जास्त ओळखलं आहे. पण या भूमिकेमुळे वेगळी मानसी दिसून येईल."चैतन्य आणि दिपक पांडुरंग राणे यांची निर्मीती असलेली या फिल्मचे दिग्दर्शन विनोद वैद्य यांनी केले आहे. तर धनंजय कुलकर्णी याचे डीओपी आहे. या फिल्ममध्ये हिंदीतील नामवंत कलाकार आहेत, या बद्दल लवकरच खुलासा होणार आहे.



# गोविंदाला ज्युनिअर आर्टिस्टसारखं वागवलं

बॉलिवूडमध्ये एक काळ असा होता जेव्हा सगळीकडे फक्त गोविंदाचीच चर्चा होती. गोविंदा हा त्याच्या का ळातील सुपरस्टार होता आणि ९० च्या दशकात त्याला सर्वाधिक मागणीही होती. प्रत्येक आघाडीच्या अभिनेत्री आणि दिग्दर्शकाला अभिनेत्यासोबत काम करायचे होते. एक काळ असा होता की त्याच्याकडे चित्रपटांची रांग लागली होती, पण गोविंदाकडे वेळ नव्हता. मग एक वेळ अशीही आली जेव्हा गोविंदाकडे वेळ होता, पण त्याच्याकडे काम नव्हते. अशा परिस्थितीत त्याने चित्रपटात सहाय्यक भूमिकाही स्वीकारल्या. असाच एक चित्रपट गोविंदाला ऑफर करण्यात आला होता, ज्यामध्ये रणबीर कपूर मुख्य भूमिकेत होता आणि या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान गोविंदाने असे दिवस पाहिले ज्याचा त्याने कधी विचारही केला नव्हता.



जग्गा जासूस हा तो चित्रपट ज्यामध्ये रणबीर कपूर आणि कतरिना कैफ मुख्य भूमिकेत होते. या चित्रपटात गोविंदा सहाय्यक भूमिकेत होता. पण, यादरम्यान गोविंदाला एका वाईट अनुभवाला सामोरे जावे लागले. रणबीरच्या चित्रपटाच्या सेटवर त्याला ज्युनिअर आर्टिस्टपेक्षा वाईट वागणूक मिळाली होती. चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान गोविंदाला त्याचे सीन शूट करण्यासाठी सेटवर तासनतास थांबावे लागले होते.

या चित्रपटात गोविंदा कुठेही दिसला नाही, मात्र तो या चित्रपटाचा एक भाग होता हे जाणून तुम्हाला आश्चर्य वाटेल. गोविंदाला चित्रपटाच्या शूटिंगसाठी दक्षिण आफ्रिकेत जावे लागले. तेव्हा गोविंदा खूप आजारी होता, पण आजारपणात त्याने दक्षिण आफ्रिकेत जाऊन चित्रपटाचे शूटिंग केले. पण, चित्रपट आला तेव्हा गोविंदा

# मराठीत बनतोय का शाहरुख-आलियाचा 'डीअर जिंदगी?'



:केतकी माटेगावकरला पाहिलं की आठवते ती 'टाइमपास' मधील प्राजू.. त्या सिनेमातील प्राजूनं अख्ख्या महाराष्ट्राला वेड लावलं होतं आणि इंडस्ट्रीला मिळाली होती उत्तम गायिकेसोबतच एक गुणी अभिनेत्री. केतरी माटेगावकरची भलतीच क्रेझ तेव्हा लोकांना होती आणि आजही तिची जादू कायम आहे.. अगदी ८ वर्षाचा मोठा ब्रेक तिनं इंडस्ट्रीमधून घेतला असला तरी. केतकीनं गाणं हे आपलं पहिलं प्रेम आहे असं सांगत त्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी अभिनयातून ब्रेक घेतला होता. पण आता ती पुन्हा येतेय 'मीरा' या तिच्या आगामी सिनेमातून.केतकीनं अनेक वर्ष आपलं गाणं आणि अभिनयानं रसिक मनावर राज्य केलंय. सा रे ग म प लिटिल चॅम्प्स मधनं पुढे आलेल्या केतकीला सुजय डहाकेचा 'शाळा' सिनेमा मिळाला अन् तिचं नशिबच पालटलं. तिच्या अभिनयाचं त्यावेळी खूप कौतूकही झालं. 'शाळा' सिनेमांनतर मांजरेकरांचा 'काकस्पर्श', 'तानी' अशा सिनेमातून केतकीनं आपल्या वयापेक्षा अधिक समज असलेल्या भूमिका साकारल्या. आणि पुढे रवी जाधवच्या 'टाईमपास'मुळे तर महाराष्ट्रातील घराघरात तिला प्राजू म्हणजे प्राजक्ता म्हणूनच ओळखलं जाऊ लागलं. आता तिच्या आगामी 'मीरा' सिनेमाविषयी तिनं काही दिवसांपूर्वी पोस्टमधून जाहीरपणे सांगितलं होतं. त्यामुळे चाहते भलतेच खूश होते. आता केतकीनं पुन्हा एक पोस्ट केलीय ज्यात तिच्यासोबत प्रसाद ओक अभिनेता म्हणून काम करणार आहे हे स्पष्ट होताना दिसत आहे.केतकी सोबत प्रसाद ओक ही जोडी पाहिल्यावर एका चर्चेला उधाण मात्र आले आहे. दोघांच्या वयामधील अंतर पाहता आता लोक म्हणू लागलेयत...मराठीतही आता शाहरुख आलियाचा 'डिअर जिंदगी' धाटणीचा सिनेमा बनतोय की काय. सिनेमाच्या कथानकावरनं तर्क वितर्क लावले जात आहेत. 'डिअर जिंदगी' मध्ये आलिया(कायरा) ही सिनेमॅटोग्राफर असते,जिचं ब्रेकअप झाल्यानं ती पूर्णतः तूटते,वैयक्तिक आयुष्यात खूप मोठ्या मानसिक संघर्षाचा सामना ती करत असते.. तेव्हा मुंबईतून गोव्यात आई-वडीलांजवळ रहायला आल्यावर तिची भेट होते एका मानसोपचार तज्ञाशी ..जी भूमिका शाहरुखनं साकारली आहे.



# रश्मिकाने केलं 'या' व्यक्तीला प्रपोज...

साऊथ सिनेसृष्टीतील टॉप अभिनेत्री रश्मिका मंदाना ही खूप लोकप्रिय अभिनेत्री आहे. दाक्षिणात्य इंडस्ट्रीत आपला वेगळा ठसा उमटवणारी ही अभिनेत्री आता बॉलिवूडमध्येही एकापाठोपाठ एक चित्रपटांमध्ये झळकत आहे. त्याचबरोबर प्रोफेशनल लाईफसोबतच रश्मिकाचे पर्सनल लाईफ देखील चर्चेत असते.

रश्मिका आणि लीगर अभिनेता विजय देवरकोंडा रिलेशनशिपमध्ये असल्याच्या अफवा आहेत. या सगळ्यामध्ये अभिनेत्रीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये रश्मिका तिच्या फॅन्सला प्रपोज करताना दिसत आहे.

करतानाचा व्हिडिओ इंटरनेटवर व्हायरल झाला आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये एक चाहता अभिनेत्रीला विचारतो की तेलुगुमध्ये मुलीला प्रपोज कसे करायचे? हा प्रश्न ऐकून रश्मिका हसत हसत चाहत्यांना विचारते, "ये हाय ... क्या बात है ... कोई है?" यानंतर अभिनेत्री तेलुगुमध्ये मॅजिकल शब्द बोलताना दिसत आहे. यावर चाहत्याने "सेम टू यू" असे उत्तर दिले. चाहत्याच्या या उत्तराने रश्मिका



# पंतप्रधानांच्या शब्दाखातर निवृत्ती घेतली मागे

## वनडे वर्ल्डकपमध्ये परतला धोकादायक

महाईन्यूज ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतात एका खेळाडूच्या निवृत्तीमध्ये चक्क पंतप्रधानांनी हस्तक्षेप करावा, असे यापूर्वी घडले नसेल. पण पंतप्रधानांच्या विनंतीला मान देत आता हा सर्वात धोकादायक खेळाडू विश्वचषकात खेळणार आहे. क्रिकेट विश्वातील सर्वात धोकादायक खेळाडू, असे त्याला म्हटले जाते. पण वर्ल्ड कपला सुरुवात होण्यापूर्वीच या खेळाडूने आपली निवृत्ती जाहीर केली होती. पण ही गोष्ट देशाच्या पंतप्रधानांना समजली आणि त्यांनी थेट हस्तक्षेप केला. पंतप्रधानांनी या खेळाडूची भेट घेतली आणि त्याला विश्वचषकात खेळण्याची विनंती केली..**

पंतप्रधानांच्या शब्दाला या खेळाडूने मान दिला आणि त्याने आता वर्ल्ड कपमध्ये खेळण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता अन्य ९ खेळाडूंचे धाबे चांगलेच दणाणलेले आहेत.

क्रिकेट हा फक्त त्याच्यासाठी खेळ नव्हता, तर आयुष्य होतं. त्यामुळे जेव्हा त्याने निवृत्तीची निर्णय जाहीर केला तेव्हा तो सर्वांसमोर ढसाढसा रडत होता. निवृत्तीच्यावेळी आपल्या लाडक्या खेळाडूला रडताना चाहत्यांनी पाहिले. त्यावेळी चाहतेही त्याच्या निवृत्तीच्यावेळी हेलावले होते. आपला लाडका खेळाडू आता विश्वचषकात खेळणार नाही, याची खंत चाहत्यांना होती. पण आज या चाहत्यांसाठी अखेर आनंदाची बातमी आली. कारण आता त्यांचा हा लाडका खेळाडू विश्वचषकात खेळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. गुरुवारी एक पत्रकार परिषद घेत त्याने आपल्या निवृत्तीची घोषणा केली होती. बांगलादेशचा वनडे कर्णधार तमिम इक्बालने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. यामुळे त्याच्या १६ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला





अचानक पूर्णविराम लागला असल्याचे म्हटले जात होते. पत्रकारांच्या गर्दीने वेढलेला तमीम खूप भावूक झाला होता आणि बोलत असताना अश्रू अनावर झाले होते. त्यामुळे बांगलादेशचे चाहते निराश झाले होते, तर काही चाहत्यांना आता विश्वचषकात बांगलादेशचे नेतृत्व कोण करणार, याची चिंता सतावत होती. पण शुक्रवारी तमीमने बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीमध्ये त्याच्या निवृत्तीचाही विषय निघाला. त्यावेळी पंतप्रधान यांनी तमीमला आपली निवृत्ती मागे घेण्यास सांगितली. त्यानंतर तमीमने आपल्या निवृत्तीचा निर्णय मागे घेतला असून तो आता विश्वचषकात बांगलादेशचे कर्णधारपद भूषवणार आहे. एखा खेळाडूच्या निवृत्तीबाबत पंतप्रधानांनी निवृत्ती घ्यावी, असे कदाचित यापूर्वी घडले नसेल. पण त्यामुळे आता हा धोकादायक खेळाडू विश्वचषक खेळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## धोनीने आपले लांब केस कोणत्या अभिनेत्रीच्या सांगण्यावरून कापले होते



नवी दिल्ली : महेंद्रसिंग धोनी हा भारताचा सर्वात यशस्वी कर्णधार मानला जातो. धोनी जेव्हा क्रिकेटच्या मैदानात उतरला होता तेव्हा तो आपल्या लांब केसांसाठीही ओळखला जायचा. धोनीच्या लांब केसांनी पाकिस्तानचे पंतप्रधानांदेखील घायाळ केले होते. पण धोनीने आरपले हे लांब केस कापले आणि सर्वांनाच धक्का बसला होता. धोनीने एका बॉलीवूड अभिनेत्रीच्या सांगण्यावरून हे लांब केस कापले होते, असे म्हटले जात होते. ती बॉलीवूडची अभिनेत्री कोण होती, याबाबतची माहिती काही दिवसांपूर्वी प्रकाशझोतात आली आहे.

धोनी आपल्या लांब केसांसह मैदानात वावरताना सर्वांनाच आवडायचा. धोनीच्या या लांब केसांचे बरेच जणं फॅन होते. धोनीने आपले केस असेच ठेवावे, असे बऱ्याच जणांना वाटत होते. पण काही काळानंतर धोनीने आपले लांब केस कापले आणि त्यानंतर तो जेव्हा पहिल्यांदा लोकांसमोर आला तेव्हा सर्वांनाच धक्का बसला होता. याबाबत धोनीला प्रश्नही विचारण्यात आले होते. पण धोनीने या प्रश्नावर उत्तर देणे टाळले होते. पण धोनीने एका बॉलीवूड अभिनेत्र्या सांगण्यावरून लांब केस कापले, याची जोरदार चर्चा होती.

क्रिकेट आणि बॉलीवूड यांचे पूर्वापार नाते आहे. त्यामध्ये धोनीचाही समावेश आहे. धोनी आणि बॉलीवूडची स्टार अभिनेत्री दीपिका पदुकोण यांच्यामध्ये अफेअर सुरु होते, असे म्हटले जात होते. धोनीने एका मुलाखतीमध्ये दीपिका आपल्याला आवडते, असेही म्हटले होते. क्रिकेटच्या मैदानात आपल्या लांब हेअरस्टाइलमुळे लोकप्रिय झालेल्या धोनीने दीपिका पदुकोणमुळेच आपले लांब केस कापले होते.

# आगरकरांनी पहिल्याच बैठकीत केला द्रविड यांच्या लाडक्या खेळाडूचा गेम!

## आता भारतीय संघात स्थान मिळणे कठीण; अजित आगरकर यांनी आपले इरादे स्पष्ट

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**अजित आगरकर यांनी पहिल्याच बैठकीत आपले इरादे स्पष्ट केले आहेत. त्यामुळे आता भारतीय संघातील राहुल द्रविड यांच्या लाडक्या खेळाडूचा गेम होणार असल्याचे समोर येत आहे. अजित आगरकरांची गोष्टच भारी आहे. आगरकर बीसीसीआयमध्ये दाखल झाले आणि पहिल्याच बैठकीत त्यांनी प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्या लाडक्या खेळाडूचा गेम केल्याचे म्हटले जात आहे. या खेळाडूला आता भारतीय संघात स्थान मिळणे कठीण आहे. कारण अजित आगरकर यांनी आपल्या पहिल्याच बैठकीत आपले इरादे स्पष्ट केले आहे.**

अजित यांची काही दिवसांपूर्वीच बीसीसीआयमध्ये निवड झाली. त्यानंतर त्यांनी लगेच एक बैठकही घेतली. या बैठकीत





अजित यांनी एक गोष्ट दाखवून दिली की, कोणताही खेळाडू आपल्या नावाच्या जोरावर संघात स्थान मिळवू शकत नाही. आपल्या पहिल्याच बैठकीत अजित यांनी यांच्यासाठी टी-२० संघाचे दरवाजे बंद करून टाकले. आगामी टी-२० विश्वचषकासाठी संघाची बांधणी सुरु करत असल्याचे आगरकर यांनी आपल्या निर्णयाच्या माध्यमातून सांगितले. पण रोहित-कोहली यांना वनडे आणि कसोटी संघात मात्र कायम ठेवले आहे. पण द्रविड यांचा लाडका खेळाडू मात्र अजूनही संघाबाहेरच आहे. तो भारतीय संघात एंट्री घेण्यासाठी उत्सुक आहे. पण त्यापूर्वीच आगरकर यांनी त्याच्यासाठी संघाचे दरवाजे




बंद केल्याची चर्चा सुरु झाली आहे.

राहुल द्रविड यांचा भारतीय संघातील लाडका खेळाडू लोकेश राहुल असल्याचे म्हटले जाते. राहुल हा गेल्या काही दिवसांपासून दुखापतीमुळे संघाबाहेर होता, पण राहुल हा फिट झाल्याचे म्हटले जात आहे. आगामी आशिया चषकासाठी त्याच्या नावाचा विचार केला जाऊ शकतो, असे काही दिवसांपूर्वी म्हटले जात होते. पण आगरकर यांनी निवड समितीचे अध्यक्षपद स्विकारल्यावर मात्र राहुलचा संघप्रवेश कठीण झाल्याचे म्हटले जात आहे. कारण फक्त फॉर्मच्या जोरावर संघ निवडला जाईल, हे अजित यांनी पहिल्याच बैठकीत स्पष्ट केले आहे. यापूर्वीच्या सामन्यांमध्ये राहुल फ्लॉप ठरला होता.

त्यामुळे यापुढे त्याला भारतीय संघात स्थान मिळणे कठीण समजले जात आहे. अजित आगरकर यांनी पहिल्याच बैठकीत आपले इरादे स्पष्ट केले आहेत. अजित आगरकर यांच्यामुळे काही खेळाडूंचे भारतीय संघातील स्थान धोक्यात आले आहे.